लोकमत

चार निवृत्त शिक्षकांच्या नावाने आता शिष्यवृत्ती

संख्याशास्त्र विभाग : दरवर्षी वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातील माजी विद्यार्थ्यांनी कृतज्ञता निधी संकलित केला आहे. त्याच्या माध्यमातून विभागातील चार निवृत्त शिक्षकांच्या नावे होतकरू आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी रोख रकमेच्या चार शिष्यवृत्ती प्रदान करून त्यांचा सन्मान करण्याचे ठरविले आहे. या शिष्यवृत्ती योजनेस या शैक्षणिक वर्षापासून औपचारिक प्रारंभ करण्यात येत आहे. दरवर्षी शिक्षक दिनी (दि. ५ सप्टेंबर) शिष्यवृत्ती वितरण करण्यात येणार आहे.

या वितागाची पायाभरणी करणाऱ्या प्रमुख शिक्षक- संख्याशास्त्रज्ञांमध्ये प्रा. एम. एस. प्रसाद, आर. एन. रट्टीहळ्ळी, एस. आर. कुलकर्णी, बी. व्ही. धांद्रा यांचा समावेश आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९८४ ते १९९५ या कालावधीत एम. एस्सी., पीएच. डी. संशोधन पूर्ण केलेल्या माजी विद्यार्थ्यांनी या प्राध्यापकांच्या योगदानाच्या कायमस्वरूपी सन्मानस्मृती जपण्याच्या भावनेतून त्यांच्या नावे चार विविध शिष्यवृत्ती देण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांनी सुमारे पाच लाख रुपयांचा कृतज्ञता निधी उभारला. त्या निधीच्या व्याजामधून अधिविभागात एमएस्सी. प्रथम व द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या प्रत्येकी दोन याप्रमाणे चार होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती अधिविभागप्रमुख डॉ. एच. व्ही. कुलकर्णी आणि माजी विद्यार्थी समिती समन्वयक डॉ. सोमनाथ पवार यांनी दिली.

> संख्याशास्त्र अधिविभागाच्या सन १९८४ ते १९९५ या कालखंडात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्या माजी विद्यार्थ्यांनी उचललेले शिष्यवृत्तीचे हे पाऊल स्वागतार्ह, अनुकरणीय आहे. या माध्यमातून या अधिविभागाच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या शिक्षकांच्या प्रती आदरभाव जपला जाईल. गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी चांगली आर्थिक मदत होईल.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरू

04 SEP 2021 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

DEPARTMENT OF TECHNOLOGY

Estd. 1962
NAAC 'A++' Grade

(AICTE Approved and Recognized by DTE, Govt. of Maharashtra)
Supported by TEQIP (Technical Education Quality Improvement Program)
Grant of World Bank through MHRD, New Delhi

Institute Code: EN 6028 **ADMISSION YEAR 2021-22**

B. Tech. Programs	Mechanical Engineering	Civil Engineering	Electronics & Telecommunication Engineering	Computer Science & Technology	Chemical Engineering	Food Technology
Choice Code	602861210	602819110	602837210	602825410	602850710	602850310
Intake	60	60	60	60	60	60

M. Tech. Programs	Energy Technology	Computer Science & Technology	Food Technology	Environmental Science & Technology	Electronics Technology
Choice Code	602837910	602825410	602850310	602821410	602837810
Intake	18	18	18	18	18

Office Phone No.- 0231- 2609424, 2609414, 2605971 Website: www.unishivaji.ac.in; http://apps.unishivaji.ac.in

For more information contact B. Tech. : 9822454255, 9423041945, 992924871, 9764997555, 9860313395, 9975490278

For more information contact M. Tech. : 9850695437,9890387898, 9860313395,9049274380, 7588272008

Department Highlights :

1) It is an Engineering Institute established & managed by Shivaji University, Kolhapur.
2) Sprawling scenic campus with well equipped Class Rooms, Laboratories, Sports & Cultural Facilities.
3) Highly qualified and well experienced faculty members & support staff.
4) Decent Separate University Hostels for Boys & Girls with good quality mess and recreational facilities.
5) All government scholarships & freeships are available as per rules.

Dr. V. D. Nandavadekar
Registrar
Shivaji University, Kolhapur

Date : 25/08/2021

पुढारी

कोल्हापूर : विद्यापीठात डॉ. निशा पवार लिखित 'मीडिया रिसर्च इन कंटेम्पररी सोसायटी' या संशोधन ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. के. कामत आदी.

विद्यापीठात डॉ. निशा पवार यांच्या संशोधन ग्रंथाचे प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंज्ञापन विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार लिखित 'मीडिया रिसर्च इन कंटेम्पररी सोसायटी' या संशोधन ग्रंथाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. 'मीडिया रिसर्च इन कंटेम्पररी सोसायटी' हा ग्रंथ डॉ. निशा पवार यांच्या निवडक माध्यमविषयक संशोधन लेखांचा संग्रह आहे. यात समकालीन माध्यम संशोधनाचा समावेश असून विशेष म्हणजे कर्नाटक विद्यापीठ, धारवाड यांच्यातर्फे हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला आहे. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा देऊन डॉ. निशा पवार यांचा गौरव केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. आर. के. कामत उपस्थित होते.

04 SEP 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिक्षकांच्या सन्मानार्थ माजी विद्यार्थ्यांचा कृतज्ञता निधी

संख्याशास्त्र अधिविभागातील चार माजी शिक्षकांच्या नावे शिष्यवृत्तीची शिक्षकदिनी होणार सुरुवात

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातील माजी विद्यार्थ्यांनी कृतज्ञता निधी संकलित करून विभागातील चार निवृत्त शिक्षकांच्या नावे होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसाठी रोख रकमेच्या चार शिष्यवृत्ती प्रदान करून त्यांचा सन्मान करण्याचे ठरविले आहे. या शिष्यवृत्ती योजनेस या शैक्षणिक वर्षापासून औपचारिक प्रारंभ करण्यात येत असून, दरवर्षी शिक्षक दिनास (दि. ५ सप्टेंबर) शिष्यवृत्ती वितरण करण्यात येईल.

नूतन विद्यापीठ कायद्यामध्ये त्याचप्रमाणे 'नॅक'च्या मूल्यांकन निकषांमध्येही माजी विद्यार्थ्यांचे योगदान, या बाबीला महत्त्व आहे. या पार्श्वभूमीवर हे पाऊल स्वागतार्ह आहे. संख्याशास्त्र अधिविभागाच्या उभारणीत योगदान देणाऱ्या शिक्षकांच्या प्रती आदरभाव जपला जाईलच. शिवाय, गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदतही होईल, अशी भावना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागाची पायाभरणी करणाऱ्या प्रमुख शिक्षक संख्याशास्त्रज्ञांमध्ये प्रा. एम. एस. प्रसाद, प्रा. आर. एन. रट्टीहळ्ळी, प्रा. एस. आर. कुलकर्णी आणि प्रा. बी. व्ही. धांद्रा यांचा समावेश आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १९८४ ते १९९५ या कालावधीत एम. एस्सी. व पीएच.डी. संशोधन पूर्ण केलेल्या माजी विद्यार्थ्यांनी या प्राध्यापकांच्या योगदानाच्या कायमस्वरूपी सन्मानस्मृती जपण्याच्या भावनेतून त्यांच्या नावे चार विविध शिष्यवृत्ती देण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांनी सुमारे पाच लाख रुपयांचा कृतज्ञता निधी उभारला. या निधीच्या व्याजामधून अधिविभागात एम. एस्सी. प्रथम व द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या प्रत्येकी दोन याप्रमाणे चार होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती दरवर्षी शिक्षकदिनास प्रदान करण्याचे ठरविले, अशी ही माहिती अधिविभागप्रमुख डॉ. एच. व्ही. कुलकर्णी व माजी विद्यार्थी समिती समन्वयक डॉ. सोमनाथ पवार यांनी दिली.

04 SEP 2021 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिक्षकांच्या सन्मानार्थ होतकरु विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

शिवाजी विद्यापीठातील माजी विद्यार्थ्यांचा उपक्रम : शिक्षक दिनी होणार वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातील माजी विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या सन्मानार्थ कृतज्ञता निधी संकलित केला आहे. निधीमधून विभागातील चार निवृत्त शिक्षकांच्या नावे होतकरू विद्यार्थ्यांना रोख रक्कमेच्या स्वरुपात शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. शिष्यवृत्ती योजनेस या शैक्षणिक वर्षापासून औपचारिक प्रारंभ करण्यात येत असून दर वर्षी शिक्षक दिनी शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येणार आहे.

प्रा. एम. एस. प्रसाद प्रा. आर. एन. रट्टीहळ्ळी प्रा. एस. आर. कुलकर्णी प्रा. बी. व्ही. धांद्रा

शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागाची पायाभरणी करणाऱ्या प्रमुख शिक्षक– संख्याशास्त्रज्ञांमध्ये प्रा. एम. एस. प्रसाद, प्रा. आर. एन. रट्टीहळ्ळी, प्रा. एस. आर. कुलकर्णी आणि प्रा. बी. व्ही. धांद्रा यांचा समावेश आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एम. एस्सी. व पीएच.डी. संशोधन पूर्ण केलेल्या माजी विद्यार्थ्यांनी या प्राध्यापकांच्या योगदानाच्या कायमस्वरुपी सन्मानस्मृती जपण्याच्या भावनेतून त्यांच्या नावे चार विविध शिष्यवृत्ती देण्याचे ठरविले.

त्यानुसार त्यांनी सुमारे पाच लाख रुपयांचा कृतज्ञता निधी उभारला. हा निधी विद्यापीठाकडे वर्ग करण्यात आला असून त्या निधीच्या व्याजामधून अधिविभागात एम. एस्सी. प्रथम व द्वितिय वर्षात शिक्षण घेणाऱ्या प्रत्येकी दोन या प्रमाणे चार होतकरू विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५००० रुपयांची शिष्यवृत्ती दरवर्षी शिक्षक दिनास प्रदान करण्याचे ठरविले.

स्वागतार्ह व अनुकरणीय पाऊल: कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

संख्याशास्त्र अधिविभागाच्या सन १९८४ ते १९९५ या कालखंडात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्या माजी विद्यार्थ्यांनी उचललेले शिष्यवृत्तीचे हे पाऊल स्वागतार्ह आणि अनुकरणीय आहे. अन्य अधिविभागांनी, महाविद्यालयांनी अशा प्रकारे आपल्या माजी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले आहे.

विद्यापीठात अभिवादन

मराठी साहित्याला पहिले ज्ञानपीठ पुरस्कार मिळवून देणारे वि. स. खांडेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. बिलास नांदवडेकर, वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. तृप्ती क़रेकट्टी, उदयसिंह राजेयादव आदी उपस्थित होते.